## प्रकरण दोन :

**संस्थेच्या कार्य आणि कर्तव्यांचा तपशील**
**विभाग आणि विभाग प्रमुखांच्या हुद्दयांची यादी**

**१) प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)**

**२) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) नियोजन व बांधकामे**

i) कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम)नियोजन व संकल्पचित्रे
ii) कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम)बांधकामे
iii) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत)वैयक्तिक

**३) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) शहर**

i) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) दक्षिण
ii) कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम) परिरक्षण
iii) कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम) प्रशितन

**४) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पश्चिम उपनगरे**

i) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत)पश्चिम उपनगरे १
ii) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पश्चिम उपनगरे २

**५) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पूर्व उपनगरे**

i) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत)पूर्व उपनगरे १
ii) कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पूर्व उपनगरे २

**एकूण कर्मचारी :-**

प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांच्या अधिपत्याखाली एकूण १००७ कर्मचारी काम करीत आहेत. यांत्रिकी व विद्युत बाबींचे उत्पादन, विविध यांत्रिकी व विद्युत कामांचे कार्यान्वितीकरण, त्यांची दुरुस्ती व परिरक्षण ही कामे जबाबदारीने पार पाडणारा अभियांत्रिकी वर्ग, कार्यालयीन प्रवर्ग आणि कारागीर / कामगार वर्ग अंतर्भूत आहे.

**कार्य :-**

यांत्रिकी व विद्युत विभागातर्फे खाली नमूद केलेली कामे हाताळली जातात:-

१) महानगरपालिकेच्या जुन्या मालमत्तेचे पूनर्तारीकरण.
२) महानगरपालिकेच्या नवीन इमारतींचे विद्युतीकरण.
३) विविध प्रकारची (सामान, प्रवासी व रुग्णपट) उद्वाहने, विद्युतदाहिनी, तरणतलाव इत्यादींचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे. (Supply, Installation, Testing and Commissioning).
४) मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणा, विंडो वातानुकूलित संच, एकत्रित (पॅकेज) यंत्रणा, प्रशितन यंत्रणा रक्तपेढी, शवागार प्रशितन संच इत्यादि विविध प्रकारच्या संयंत्रांचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

५) महानगरपालिका इमारतींमध्ये पाण्याच्या उदंच्छक (पंप) संचांचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

६) अग्निशमन यंत्रणेचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

७) दूरभाष केंद्र (इपीएबीएक्स) यंत्रणा, ध्वनी यंत्रणा, दृक्श्राव्य चित्रदर्शक, व्ही.सी.आर., दूरदर्शन संच इत्यादिंचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

८) कारंजे, कठडे इत्यादिंचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

९) खेळण्यांच्या संचांचा पुरवठा व स्थापना.

१०) उद्यानांचे सुशोभिकरण, खेळांच्या मैदानासहित उद्यानांची रोषणाई करणे.

११) घनकचरा व्यवस्थापन, मलनि:सारण प्रचालन, रस्ते, उद्यान अधिक्षक, पर्जन्य जलवाहिन्या आणि विभागीय कार्यालये यांसारख्या विविध विभागांसाठी ओतीव लोखंडाच्या मॅनहोलच्या चौकटी व झाकणे, लोखंडी हातगाडया, कचरापेटया, वृक्ष संरक्षक जाळया इत्यादि तयार करुन त्याचा पुरवठा करणे.

१२) रुग्णालयातील शल्यकक्ष आणि अतिदक्षता विभाग यांच्यासाठी डिझेल इंजिनवर कार्य करण्यासाठी डिझेल विद्युत जनित्र पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

१३) वातानुकूलीत संच, उद्वाहने, डिझेल विद्युत जनित्र, विद्युत सरंजाम, फर्निचर, कारंजे, वैद्यकीय ऋणकणीय सामुग्री, इतर वैद्यकीय साधनसामुग्री हयासारख्या विविध यांत्रिकी व विद्युत साधन सामुग्रीची दुरुस्ती व देखभाल हया विभागामार्फत तसेच खाजगी संस्थांमार्फत करवून घेतली जाते.

१४) विविध खात्यांना संगणकाचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे. तसेच वरळी डाटा सेंटरशी संलग्नता येण्यासाठी लॅनचे तारतंत्रीकरण करणे.

१५) वाहनकाटयांचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे.

१६) धूम्रजंतु संयंत्राचा पुरवठा तयार करणे आणि स्थापना करणे.

१७) रस्तारुळांची खरेदी, दुरुस्ती व परिरक्षण.

१८) विद्युतदाहिनी व भस्मीकरण संयंत्र इत्यादिचा पुरवठा आणि स्थापना.

१९) महापालिका, विद्युत धुलाई केंद्रामार्फत रुग्णालयातील कपडे धुणे.

२०) प्रखर झोताच्या उंच दिव्यांची तरतूद व देखभाल.

२१) हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, विविध दहनभूमींसाठी पुरविणे व बसविणे.

२२) बॉयलर चिमणी, वॉशिंग मशीन इ. सारख्या धुलाईकेंद्रासाठीची सामुग्री पुरविणे व बसविणे.

**यांत्रिकी व विद्युत विभागातर्फे खालील दर्शविलेल्या यंत्र–संयंत्राची देखभाल केली जाते :-**

| | |
|---|---:|
| उद्वाहन | २३५ |
| पाण्याचे पंप | १८४८ |
| विंडो मॉडेल वातानुकूलित यंत्र | १३५५ |
| पॅकेज वातानुकूलित यंत्रणा | २०६ |
| मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणा | ४५ |
| शवागार यंत्रणा | १७ |
| फिरत्या शितपेटया आणि रक्तपेढी प्रशितन | ४३ |
| शवागार कपाटे | १३ |
| शितजल यंत्र | ४९५ |
| स्प्लीट वातानुकूलन यंत्रणा | ४८४ |
| वातानुकूलन यंत्र | ११७४ |

विविध विभागांना यांत्रिकी व विद्युत सेवा दिली जाते. हया सेवा वेळेवर व परिणामकारकपणे देण्यासाठी कर्मचाऱ्यांची विभागीय रचना खाली दर्शविल्यानुसार अस्तित्वात आहे.

**उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) नियोजन व बांधकामे :**

१) नियोजन, संचित्रीकरण, निविदा प्रक्रिया आणि उद्वाहन प्रस्थापना, मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणा, स्मशानभूमी, इपीएबीएक्स यंत्रणा अग्नीप्रतिबंध यंत्रणा इत्यादी प्रकल्पांचे कार्यान्वीतीकरण याची जबाबदारी यांच्यावर आहे.

२) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत)नि व बां यांना कार्य. अभि. यां (वि.प्र) नि व सं. व कार्य. अभि. यां (वि.प्र) बांधकामे कामात सहाय्य करतात.

कार्य. अभि. यां (वि. प्र) नि व सं यांच्यावर वरीलप्रमाणे नमुद केलेली प्रकल्प कामाच्या नियोजन, संचित्रीकरण व निविदा प्रक्रियेची जबाबदारी आहे तसेच कार्यकारी अभियंता यांत्रिकी (वि. प्र) नि व सं यांनी निविदा मागविलेली कामे पूर्ण करुन कार्यान्वीत करण्याचे काम कार्य. अभि. यां (वि.प्र) बांधकामे करतात.

३) (अ) एच व्ही एसी, हवा खेळती रहाणे, यांत्रिकी वायूविजन दिव्यांची व्यवस्था, व

(ब) बृहन्मुंबई महानगरपालिकेला हस्तांतरीत होणाऱ्या मालमत्तांच्या विद्युतीकरणाबाबत प्रस्तावांना मान्यता देणे.

४) खात्यासाठी "वाजवी बाजारभाव सूची" परीरक्षीत करणे, विविध उत्पादक व त्यांच्या उत्पादकांना मान्यता देणे.

**उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) शहर :**

शहर विभागातील यांत्रिकी व विद्युत कामांची दुरुस्ती व परिरक्षणाची जबाबदारी यांच्याकडे आहे आणि महानगरपालिका कार्यशाळा आणि महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्राची व्यवस्था हे पाहतात.

**उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पूर्व उपनगरे :**

१) पूर्व उपनगरातील यांत्रिकी व विद्युत सरंजामाची दुरुस्ती व देखभालीची जबाबदारी हयांच्यावर आहे.

२) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पूर्व उपनगरे यांना कार्यकारी अभियंता कामात सहाय्य करतात. सदर कार्यकारी अभियंता कामाच्या प्रकारानुसार कामाची आखणी करुन काम कार्यान्वित करण्याची जबाबदारी पार पाडतात.

**उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पश्चिम उपनगरे :**

१) पश्चिम उपनगरातील यांत्रिकी व विद्युत सरंजामाची दुरुस्ती व देखभालीची जबाबदारी हयांच्यावर आहे.

२) उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) पश्चिम उपनगरे यांना कार्यकारी अभियंता कामात सहाय्य करतात. सदर कार्यकारी अभियंता कामाच्या प्रकारानुसार कामाची आखणी करुन काम कार्यान्वित करण्याची जबाबदारी पार पाडतात.

प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) / उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) शहर / उप प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) उपनगरे यांच्या अधिपत्याखाली एकूण १० कार्यकारी अभियंता काम पहात असून त्यांच्या कामाची जबाबदारी खाली दर्शविल्यानुसार आहे:-

**कार्यकारी अभियंता यांत्रिकी (दक्षिण) :**

१) महानगरपालिका कार्यशाळा व महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्रासाठी संपूर्ण जबाबदारी हयांची आहे.

२) शहर, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरांसाठी हातगाडया, मॅनहोल सांगाडे व झाकणे, वृक्ष संरक्षक जाळया आणि इतर यांत्रिकी संच व इतर तयार करणे आणि पुरवणे.

३) पाण्याचे पंप, स्मशाने, विद्युतदाहिन्या, भस्मीकरण संयंत्र आणि रुग्णालयातील इतर सामुग्री आणि तरणतलाव यांची यांत्रिकी दुरुस्ती.

४) शाळा आणि इतर विभागातील फर्निचर आणि यांत्रिकी सरंजामांची दुरुस्ती.

५) यांत्रिकी सामुग्रीची दुरुस्ती व रंगकाम.

**कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम) परिरक्षण :**

१) शहर विभागातील पाण्याच्या पंपांची दुरुस्ती व देखभाल.

२) जुन्या इमारती व इतर महानगरपालिका संच मांडणींचे पुर्नतारीकरण व विद्युतीकरण (विभागीय कर्मचारी तसेच खाजगी संस्थांकडून). तसेच लॅनसाठी तारीकरण

३) भस्मीकरण संयंत्र व विद्युतदाहिनी इत्यादींची विद्युत दुरुस्ती.

४) उद्वाहनांची दुरुस्ती व देखभाल.

५) शहर विभागातील अंतर्गत दूरध्वनी यंत्रणा व ध्वनी यंत्रणा यांची दुरुस्ती.

**कार्यकारी अभियंता यांत्रिकी (प्रशितन) :**

१) सर्व प्रकारच्या वातानुकूलित संयंत्राची दुरुस्ती आणि परिरक्षण.

२) रक्तपेढी प्रशितक व शवागार वातानुकूलित यंत्रणा इत्यादी थंड तापमानाची संयंत्राची दुरुस्ती आणि परिरक्षण.

३) जलशितक व डीपफ्रीझर यासारख्या प्रशितन संयंत्रांची दुरुस्ती व परिरक्षण.

**कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत)पूर्व उपनगरे १ व २ :**

१) पूर्व उपनगरातील पाण्याच्या पंपांची दुरुस्ती व परिरक्षण.

२) विभागीय कर्मचारी तसेच खाजगी संस्थांकडून जुन्या इमारती व इतर महानगरपालिका संच मांडणींचे पुनर्तारीकरण व विद्युतीकरण

३) भस्मीकरण संयंत्र व विद्युतदाहिनी इत्यादींची विद्युत दुरुस्ती.

४) उद्वाहनांची दुरुस्ती व देखभाल.

५) पूर्व उपनगरांतील दूरध्वनी यंत्रणा व ध्वनी यंत्रणा यांची दुरुस्ती.

**कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत)पश्चिम उपनगरे १ व २ :**

१) पश्चिम उपनगरातील पाण्याच्या पंपांची दुरुस्ती व परिरक्षण.

२) जुन्या इमारती व इतर महानगरपालिका संच मांडणींचे पुनर्तारीकरण व विद्युतीकरण (विभागीय कर्मचारी तसेच खाजगी संस्थांकडून).

३) भस्मीकरण संयंत्र व विद्युतदाहिनी इत्यादींची विद्युत दुरुस्ती.

४) उद्वाहनांची दुरुस्ती व देखभाल.

५) पश्चिम उपनगरांतील दूरध्वनी यंत्रणा व ध्वनी यंत्रणा यांची दुरुस्ती.

**कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम)नियोजन व संकल्पचित्रे :**

१) विद्युतीय व प्रशितन संयंत्रांसाठी आराखडे व अंदाज तयार करणे.

२) विविध विद्युत व यांत्रिकी कामांचे विनिर्देश तयार करणे, निविदा मागविणे, कंत्राटाची अंमलबजावणी करणे.

३) विक्रेत्यांच्या यादीमध्ये वाढ करणे.

४) यांत्रिकी व विद्युत विषयांच्या व कामांच्या विनिर्देशात दुरुस्ती करणे.

५) संगणकाच्या स्थापना आणि कार्यान्वितीकरणासहित विनिर्देश तयार करणे व वरळी डाटा सेंटरशी संलग्नतेसाठी लॅनचे तारीकरण करणे.

**कार्यकारी अभियंता यांत्रिकी (विद्युत सरंजाम)बांधकामे :**

१) काम कार्यान्वित करणाऱ्या संस्थांकडून सादर केलेले विद्युत परिक्रम व रेखाकृतीला मंजुरी देण्याची जबाबदारी.

२) यांत्रिकी व विद्युत उभारणी कामांवर देखरेख.

३) विविध विद्युत व यांत्रिकी उपकरणांचा पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वितीकरण करणे व लॅनशी संलग्नतेसाठी कामे करणे.

**कार्यकारी अभियंता (यांत्रिकी व विद्युत)वैयक्तिक**

१) प्रमुख अभियंता (यांत्रिकी व विद्युत) यांना दैनंदिन कामात सहाय्य करणे.

१०३, आर.एस.निमकर मार्ग, भायखळा येथील महानगरपालिका कार्यशाळा व परेल भोईवाडा येथील महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्र, हया उत्पादन अभिमुख शाखा असून अनुक्रमे वृक्षसंरक्षक जाळया, हातगाडया, मॅनहोल सांगाडे व झाकणे आणि रुग्णांलयातील कपडे धुणे यासाठी जबाबदार आहेत. या शाखांसाठी ठरविलेले वार्षिक लक्ष खालीलप्रमाणे आहे:-

**अ) महानगरपालिका कार्यशाळा :**

| | | |
|---|---|---|
| वृक्षसंरक्षक जाळया | : | ५००० नग |
| हातगाडया | : | ३०० नग |
| ओतीव लोखंडाचे मॅनहोल सांगाडे व झाकणे | : | २५०० जोडी |
| प्रेतदहन चिता | : | २० संच |

**ब) महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्र :**

महानगरपालिका विद्युत धुलाई केंद्रात ट्रॅक्टर ट्रेलर व्यवस्था व पिकअप व्हॅनने रुग्णालयातील कपडे आणले जातात. मनपा विद्युत धुलाई केंद्रात प्रत्येक दिवशी दोन पाळयांमध्ये १६००० कपडे धुण्याची वेळापत्रक क्षमता आहे आणि विविध ५७ वैद्यकिय संस्थाकडून आलेले २६,००,००० कपडे धुण्याचे वार्षिक उत्पादन आहे.

सदर काम करण्यासाठी येणारा वार्षिक खर्च रु.११,५७,३६,०७९/- एवढा आहे.